# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची तिसरी बैठक दि. १७/०८/९६ रोजी मा. मंत्री (पा) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म.पुणे यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे झाली.
सदर बैठकीत खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली

ठराव क्र. ३/१

'ठराव करण्यात येतो की, दुसऱ्या बैठकीमध्ये मंजूर झालेले ठराव वाचून कायम करण्यात येत आहेत.'

ठराव ३/२

अ) 'ठराव करण्यात येतो की, इ.स.१९९६-९७ या वर्षामध्ये दुसऱ्या टप्प्यात **Public Issue** द्वारे ५००० रू. किंमतीच्या ५,००,००० ( ५ लक्ष) रोख्यांद्वारे किंवा उचित किंमतीच्या व परिमाणाच्या रोख्यांद्वारे रू. २५० कोटी इतका निधी उभारण्यास महामंडळाची मान्यता देत आहे.'

ब) 'ठराव करण्यात येतो की, 'अ' मधील रोखे वितरण करण्याच्या संदर्भात अरेंजर म्हणून **"DSP Financial Consultant Ltd., Mumbai"** ही संस्था व आवश्यक त्या इतर संस्था यांची नेमणूक मा. अध्यक्षांच्या सहमतीने करण्यास कार्यकारी संचालक यांना प्राधिकार देण्यात येत आहेत.'

क) 'ठराव करण्यात येतो की, दुसऱ्या टप्प्यामध्ये **Public Issue** द्वारे निधी उभारण्यासाठी आवश्यक त्या विश्वस्त संस्था मा. अध्यक्षांच्या सहमतीने नेमण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.'

ड) 'ठराव करण्यात येतो की, वरील 'अ' मधील रोखे वितरण करण्यासाठी
आवश्यक तो
१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
२) महाराष्ट्र शासन
३) विश्वस्त संस्था

यांच्या मधील त्रिपक्षीय कराराच्या प्रारूपास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महामंडळातर्फे या करारावर स्वाक्षरी करण्यास कार्यकारी संचालकांना प्राधिकार देण्यात येत आहेत. तसेच प्रारूपात शासन निदेश देईल त्याप्रमाणे वाढ / बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

कार्यकारी संचालक
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

ठराव क्र.३/३(अ)

'ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र अधिनियम क्र.१५ मधील कलम २५ पुढीलप्रमाणे असून,

**"The State Government may issue to Corporation such general or special direction as to policy or exercise of the powers or performance of the function by the Corporation as it may think necessary or expedient for carrying out the purposes of this act and the Corporation shall be bound to follow and act upon such directions "**

हे कलम - २५ खालील प्रमाणे सुधारित करण्यास व त्या प्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

सुधारित कलम - २५

**"The State Government may issue to Corporation such general or special direction as to policy or exercise of the powers or performance of the function by the Corporation as it may think necessary or expedient for carrying out the purposes of this act, excepting in respect of levy of water charges & day to day working / operation of Corporation in the matter of recovery of water charges and the Corporation shall be bound to follow and act upon such directions "**

ठराव क्र.३/३(ब)

'ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र अधिनियम क्र.१५ मधील कलम ३१(१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यास व त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**"Provided further that the Government of Maharashtra shall continue to contribute a sum of Rs. 700 crores per year from the Consolidated Fund of the State towards the payment of Principal amount after 2000 A.D., to the Corporation till the repayment principal amount of moneys borrowed from open market is over"**

ठराव क्र. ३/३(क)

'ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र अधिनियम क्र. १५ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास व तसा प्रस्ताव शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यास महामंडळ मान्यता देत आहे. '

**"Section 33 (3) - Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, the debentures and bonds of Corporation shall be deemed to be " Public Security " for the purpose of Section 2 (12) (d) of the Bontbay Public Trust Act, 1950"**

कार्यकारी संचालक
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

ठराव ३/४

'ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील अतिरिक्त निधी कमी मुदतीच्या गुंतवणुकीसाठी वित्त विभागाच्या निर्णय क्र. पीएसयु - ११९५/ सीआर ३ / पीएसयु दि. ६-१०-९५ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार व त्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलांनुसार अतिरिक्त निधी गुंतविण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत.'

ठराव क्र. ३/५

अ) 'ठराव करण्यात येतो की, यावर निर्णय घेण्यासाठी महामंडळाच्या कार्यकारी संचालक आणि कार्यकारी समितीला खालीलप्रमाणे मंजूरीचे अधिकार देण्यात येत आहेत.

य) कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| १) निविदा अधिक्य | - | ५% पर्यंत प्रचलीत दरसूचीनुसार अधिक्य मंजूरी |

र) कार्यकारी समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | निविदा अधिक्य | - | १५% पर्यंत प्रचलित दरसूचीनुसार अधिक्य - टीप १ पहावी |
| २) | लवाद निर्णय व कंत्राटविषयक मागण्या / क्लेम्स | - | रू. १५ लक्ष मर्यादेपर्यंत टीप १ पहावी |

<u>टीप १</u> :-

निविदा अधिक्य व लवाद निर्णय व कंत्राटविषयक मागण्या / क्लेम्स चे कार्यकारी समितीचे अधिकार मा.मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजूरीच्या अधिन राहतील.

ब) 'ठराव करण्यात येतो की, निविदा अधिक्य (किंवा कमी), लवाद निर्णय व कंत्राटविषयक मागण्या / क्लेम्स या विषयासंबंधी वित्त सचिव व पदसिध्द सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे निविदा समिती व क्लेम्स समिती स्थापन करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत असून, निविदा समितीचे व क्लेम्स समितीचे वित्तीय अधिकार खाली नमूद केल्यानुसार ठेवण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

कार्यकारी संचालक
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

१) निविदा समिती

| निविदा समितीची रचना | | | | वित्तीय अधिकार |
|---|---|---|---|---|
| प्रधान सचिव (वित्त) व महामंडळाचे पदसिध्द सदस्य | - | समिती प्रमुख | १) | १५% पेक्षा जास्त अथवा १५% हून कमी,प्रचलित दरसूचीनुसार अधिक्य / कमी असलेल्या निविदा एकमताने मंजूर करणे |
| कार्यकारी संचालक, महामंडळ | - | सदस्य | | |
| संबंधित मुख्य अभियंता | - | सदस्य | | |
| मुख्य अभियंता, महामंडळ | - | सदस्य | | |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ | - | सदस्य | २) | रू. १५ लक्ष पेक्षा अधिक ते रू ५० लक्ष पर्यंतचे लवाद निर्णय, कंत्राटदारांच्या मागण्या / क्लेम्स एकमताने मंजूर करणे. |
| अधीक्षक अभियंता, महामंडळ | - | सदस्य सचिव | | |
| | | | ३) | वरील अधिकार मा. मंत्री. (पा) व अध्यक्ष यांच्या मंजूरीच्या अधीन राहतील |

२) क्लेम्स समिती

| क्लेम्स समितीची रचना | | | वित्तीय अधिकार |
|---|---|---|---|
| प्रधान सचिव (वित्त) व महामंडळाचे पदसिध्द सदस्य | - | समिती प्रमुख | रू ५० लक्ष पेक्षा जास्त किंमतीचे लवाद निर्णय, कंत्राटदारांच्या मागण्या / दावे / क्लेम्स एकमताने मंजूर करणे |
| कार्यकारी संचालक, महामंडळ | - | सदस्य | |
| संबंधित मुख्य अभियंता | - | सदस्य | |
| मुख्य अभियंता, महामंडळ | - | सदस्य | हे अधिकार मा. मंत्री. (पा) व अध्यक्ष यांच्या मंजूरीच्या अधीन राहतील |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ | - | सदस्य | |
| महामंडळाचा कायदा सल्लागार | - | निमंत्रित | |
| अधीक्षक अभियंता, महामंडळ | - | सदस्य सचिव | |

क) 'ठराव करण्यात येतोकी,

१) निविदा समिती प्रचलीत दरसूचीनुसार १५ % पेक्षा जास्त अधिक्य किंवा १५% हून कमी असलेल्या निविदांच्या बाबतीत एकमताने निर्णय घेईल व या निर्णयास मा. मंत्री. (पा.) व पदसिध्द अध्यक्ष यांची मान्यता मिळाल्यावर सदर निविदा स्वीकारली जाईल.

२) क्लेम्स समिती रू. ५० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या लवाद निर्णय / कंत्राटदाराच्या मागण्या / दावे या बाबतीत एकमताने निर्णय घेईल व या निणर्याला मा. मंत्री. (पा) व पदसिध्द अध्यक्ष यांची मान्यता मिळाल्यावर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

कार्यकारी संचालक
[illegible]

३) लवाद निर्णय व क्लेम्सच्या बाबतीत वरील कोणत्याही स्तरावर घेतलेले निर्णय जर कंत्राटदाराला मान्य नसेल किंवा कोणत्याही समितीत एकमत होत नसेल तर कार्यकारी संचालक ही बाब मा. मंत्री (पा) व पदसिध्द अध्यक्ष यांच्या मान्यतेनंतर नियामक मंडळासमोर अंतिम निर्णयार्थ सादर करील.'

ठराव क्र ३/६

'ठराव करण्यात येतो की, महामंडळासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये रु. २५० कोटीचे रोखे **Public Issue** द्वारे उभारण्यासाठी प्रचार मोहिम जनसंपर्काची मोहीम राबविण्यासाठी **Market Missionaries** व **तत्सम अन्य संस्थेची नेमणूक करण्याचे** अधिकार मा. अध्यक्षांच्या सहमतीने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहे.'

ठराव क्र ३/७

'ठराव करण्यात येतो की, महामंडळासाठी कायदे सल्लागार सचिव (न्याय व विधी), महाराष्ट्र शासन यांच्या सल्ल्याने व मा. अध्यक्ष महामंडळ यांच्या सहमतीने एक वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने नेमण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहे.'

ठराव क्र ३/८

'ठराव करण्यात येतो की, पाणीपट्टी व्यतिरिक्त अधिनियम क्र. १५ मधील कलम - १८ (ग ते ज) मध्ये नमूद केलेल्या इतर बाबींमधून ( उदा. मत्स्य व्यवसाय, पर्यटन विकास इ.) महसूल वाढविण्यासाठी व कृष्णा खोऱ्याचा विकास करण्यासंबंधीच्या अन्य योजना सुचविण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ सल्लागारांची मा. अध्यक्ष महामंडळ यांच्या सहमतीने नेमणूक करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहे.'

ठराव क्र. ३/९

'ठराव करण्यांत येतो की, प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी भूसंपादन प्रक्रियेतील वेळ कमी करण्याकरीता ('रेडी रेकनर' प्रमाणे जमिनजुमला व मालमत्तेची खरेदीची किंमत ठरवून शेतकऱ्यांना लगेच मोबदला देण्याची व्यवस्था करण्याची) व बाधीत व्यक्तिंचे पुनर्वसन त्वरेने करण्यासाठी महामंडळाची खालीलप्रमाणे त्रिसदस्य समिती नेमण्यात यावी व त्यांनी या विषयावर अहवाल द्यावा.'

प्रधान सचिव (म. व पु.) आणि पदसिध्द सदस्य
सचिव (वने) आणि पदसिध्द सदस्य
सचिव (पाटबंधारे) आणि पदसिध्द सदस्य
अधीक्षक अभियंता महामंडळ - समिती सचिव

कार्यकारी संचालक
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-४११ ०११

ठराव क्र. ३/१०

'ठराव करण्यांत येतो की, महामंडळाचे आयकर नोंदणी प्रमाणपत्र, महामंडळास व्याजावरील आयकरातून सवलतीचे प्रमाणपत्र प्राप्त करणे इ. करांच्या बाबी हाताळणे, तसेच लेख्यांची तपासणीसाठी 'चार्टर्ड अकौंटंट्स' यांची नेमणूक करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या सहमतीने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.'

२९/८/९९

कार्यकारी संचालक व सदस्य सचिव
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे - ११

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे - ११